पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 04/11/2019 (सोमवार)
(दुपार)

---

## जबर दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 15 कि.मी अंतरावर मौजा गौंडखैरी पारधी बेळा येथे दिनांक 03/11/2019 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— अनेकर शाम पवार, वय 25 वर्ष, रा. गौंडखैरी व त्याचा चुलत भाऊ नामे— रूकेश पुरूषोत्तम पवार, वय 18 वर्ष व गणेश कैन्हयालाल पवार यांना आरोपी क्र. 1) अजय पवार, 2) गुड्डु अशोक पवार, 3) विश्वास देवीदास पवार व 4) देवीदास पवार यांनी लग्नात झालेल्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करून काठीने व चाकुने मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच आरोपीतांनी पुन्हा मारण्याची धमकी दिली. यानंतर आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने तोंडावर मारले त्यामुळे तोंडाचे भारावर दरवाज्यावर जाऊन आपटल्याने फिर्यादीचे समोरील दात पडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 326, 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिलीप सपाटे हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर खैरीहर्जी येथे दिनांक 03/11/2019 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— ग.भा अनीता विजय गोंडाणे, वय 38 वर्ष, रा. खैरीहजी त्यांच्या घरासमोर जाऊन आरोपी नामे— 1) सतीश प्रकाश गीरमकर, वय 39 वर्षे, 2) हनुमान प्रकाश गीरमकर, 3) पींटु प्रकाश गीरमकर व 4) प्रकाश गीरमकर, सर्व रा. खैरीहर्जी वाद घातला. यानंतर आरोपीतांनी संगणमत करून आरोपी क्र. 1 याने फिर्यादीस 50,000/— रूपये मागीतले. यानंतर आरोपीतांनी फिर्यादी सोबत त्यास कशाचे पैशे असे म्हटले असता आरोपी क्र. 1 याने त्याचे हातातील धारदार वस्तुने फिर्यादीचे डाव्या हातावर मााहाण करून जखमी केले. तसेच फिर्यादीची आई सौ. सुमन अर्जुन दुपारे या झगडा सोडवीण्यासाठी मध्यस्ती गेल्या असता आारोपी क्र. 2 याने तिचे कपाळावर काठीने मारहाण करून जखमी केले व पुन्हा त्यांना मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 323, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सावध हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर